# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:19.06.2025** **वार:गुरुवार**

---

1. जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ भागवत धर्म जगभरात पोहोचवेल, मुख्यमंत्र्यांचा विश्वास.
2. जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा 340 वा पालखी प्रस्थान सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न.
3. राज्य शिक्षण मंडळाच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना हिंदी भाषा ही तृतीय भाषा म्हणून अनिवार्य नाही, सरकारी अध्यादेश जारी
4. कादंबरीकार प्रदीप कोकरे आणि कवि सुरेश सावंत यांना साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर. आणि
5. अरण्यऋषि मारुति चितमपल्ली यांचं देहावसान

**फडणवीस**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं पुणे-आळंदी पालखी मार्गावर वडमुखवाडी इथं उभारण्यात आलेल्या संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत नामदेव महाराज भेटीचं समूहशिल्प आणि संतसृष्टीचं लोकार्पण, श्री क्षेत्र टाळगाव, चिखली इथं वारकरी संप्रदायासोबत अत्याधुनिक शिक्षण देणारी शैक्षणिक संस्था विकसित केलेल्या जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठाच्या कलादालन आणि सभागृहाचं लोकार्पण यासह विविध विकास प्रकल्पांचं भूमीपूजन आणि उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल करण्यात आलं. यावेळी खासदार श्रीरंग बारणे, संतपीठाचे संचालक डॉक्टर सदानंद मोरे, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठ इथं शिकणारा विद्यार्थी भागवत धर्म जगभरात पोहोचवेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. या संस्थेविषयी बोलताना ते पुढं म्हणाले.....

**आपला विचार हा वैश्विक विचार आहे जगाला साद घालणारा आणि जगाला दिशा दाखवणारा विचार आहे. या संतपीठामध्ये जी रचना करण्यात आलेली आहे, संस्कृत मराठी हिंदी आणि इंग्रजी या चारही भाषांमध्ये हा विचार त्या ठिकाणी आमच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचतोय. हा विचार जर वैश्विक करायचा असेल तर विविध भाषांमध्येही हा विचार पोहचवणारी मंडळी असली पाहिजे. आपली जी संस्कृती आहे त्यातली मूल तत्व घेऊन आधुनिक पद्धतीनं त्याची मांडणी आम्हाला कशी करता येईल, असा एक अतिशय चांगला प्रयत्न हा संतपीठाच्या माध्यमातून झाला आहे. संतपीठाच्या विस्ताराकरता ज्या ज्या प्रकारचे आपण या ठिकाणी प्रयत्न कराल, त्याच्या पाठीशी महाराष्ट्र सरकार भक्कमपणे उभं राहील हा विश्वास देखील या निमित्ताने मी देतो.**

**पालखी प्रस्थान सोहळा**

जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा 340 वा पालखी प्रस्थान सोहळा मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात श्री क्षेत्र देहू इथं काल संपन्न झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या सोहळ्यात सहभागी झाले. भागवत धर्म आणि वारकरी संप्रदाय यांनी शेकडो वर्ष आक्रमणातून आपल्या देवतेचं संस्कृतीतून रक्षण केल आहे. म्हणून वारकरी संप्रदायाची जोड घेऊन आपली संस्कृती पुढं जात आहे. या प्रस्थान सोहळ्यात सहभागी होऊन आपल्याला अतिशय आनंद झाला अशी भावना फडणवीस यांनी व्यक्त केली.

पंढरीच्या वारीसाठी मोठ्या संख्येनं वारकरी देहू नगरीत दाखल झाले होते. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते तुकाराम महाराजांच्या पादुकांचं पूजन, पालखीची विधिवत प्रस्थान पूजा आणि आरती करण्यात आली. महापुजेनंतर पालखीनं इनामदार वाड्यातील मुक्कामाकडं प्रस्थान केलं. या सोहळ्यात सुमारे 500 दिंड्या सहभागी झाल्या आहेत.

पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनीदेखील जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज संस्थान श्री क्षेत्र देहू इथलं श्री विठ्ठल रखुमाई मंदिर, श्री संत तुकाराम महाराज शिळा मंदिर आणि श्रीराम मंदिरात दर्शन घेतलं. संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी आज आळंदीतून प्रस्थान ठेवणार आहे.

**हिन्दी शासन निर्णय**

इयत्ता पहिली पासून हिंदी भाषा सक्तीची करण्याच्या निर्णयावरून सध्या राज्यात वाद आहेत मात्र हिंदी भाषा अनिवार्य नसून मराठी भाषा ही सक्तीची करण्यात आली आहे. मराठी भाषेला पर्याय नाही असं सरकारी निर्णयामध्ये असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पिंपरी चिंचवड इथं बातमीदारांशी बोलताना स्पष्ट केलं. राज्य शिक्षण मंडळाच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना हिंदी भाषा ही तृतीय भाषा म्हणू अनिवार्य नाही, असं राज्य सरकारनं स्पष्ट केलं असून यासंदर्भात सरकारनं शुद्धीपत्रक जारी केलं आहे. आता विद्यार्थ्यांना हिंदीऐवजी इतर भारतीय भाषा निवडण्याचा पर्याय असून, किमान 20 विद्यार्थी इच्छुक असतील तर शिक्षक नियुक्ती किंवा ऑनलाईन शिक्षणाची व्यवस्था करता येईल, असं या पत्रकात म्हटलं आहे.

**सरकारची-11-वर्षे-योगाची उत्क्रांती**

11 वा आंतरराष्ट्रीय योग दिवस परवा 21 जूनला जगभरात साजरा केला जाणार आहे. आकाशवाणी न्यूज प्राचीन भारतीय परंपरेपासून जागतिक चळवळीपर्यंत योगाच्या उत्क्रांतीबद्दल एक विशेष वृत्त सादर करीत आहे. योग दिनानिमित्त हे वृत्त, माझ्या सहकारी माधुरी कुलकर्णी यांच्याकडून...

**योगशास्त्राचा इतिहास भारताच्या प्राचीन संस्कृतीत खोलवर रुजलेला आहे. त्याची सुरुवात सिंधू-सरस्वती खोऱ्याच्या संस्कृतीच्या सुरुवातीपासूनच एक ध्यात्मिक साधना म्हणून झाली आणि हळूहळू आत्म-साक्षात्काराच्या दिशेने एक शिस्तबद्ध मार्ग म्हणून त्याचा विकास झाला. अनेक वर्षांपासून, विद्वानांचा असा विश्वास होता की योगशास्त्राचा उगम बौद्ध धर्माच्या उदयादरम्यान सुमारे 500 ईसवीसनपूर्व झाला. तथापि, सिंधू-सरस्वती खोऱ्यातील पुरातत्वीय निष्कर्षांवरुन योगशास्त्र खूप जुनं असल्याचं सूचित होतं. कालांतराने, ही प्रथा एका समृद्ध शाखेत बहरली आणि वेद, उपनिषद आणि नंतर पतंजलीच्या योग सूत्रांद्वारे प्रवाहित झाली. महाभारतातील योगशास्त्राच्या सखोल संदर्भांपासून ते स्वामी विवेकानंद आणि बी.के.एस. अय्यंगार यांच्यासारख्या महान गुरूंनी 19 व्या आणि 20 व्या शतकात त्याचं पुनरुज्जीवन केलं - योगशास्त्राचं प्राचीन परंपरेतून सार्वत्रिक शिस्तीमध्ये रूपांतर झालं. 2014 मध्ये, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेला संबोधित करताना 21 जून हा आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून प्रस्तावित मांडला, त्याला प्रचंड समर्थन मिळालं. तेव्हापासून, 21 जून हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जात आहे. या आठवड्यात आपण 11 वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करत असताना, त्याची मध्यवर्ती संकल्पना "एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग" अशी एकता आणि कल्याणाचा संदेश देणारी आहे. एखाद्याचा धर्म, वंश किंवा राष्ट्रीयत्व काहीही असो, योग निरोगी, अधिक संतुलित आणि अर्थपूर्ण जीवनाचा मार्ग दाखवतो.**

**योगदिन आसने**

योगदिनाच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर इथले योगशिक्षक डॉक्टर हेमंत झिळे यांनी हलासन या आसनाविषयी श्रोत्यांना माहिती दिली...

**शयनस्थितीमधून श्वास घेत पाय सरळ वरती उचलून जमिनीशी काठ कुणात आणावेत. बाहूंवर जोर देत पाठ वर उचलून पाय डोक्यावरून मागे नेत पायाची बोटे जमिनीवर टेकवण्याचा प्रयत्न करावा. पण अवाजवी जोर मात्र नको.**

**हाताचे तळवे वर वळवत सर्वांगासनाप्रमाणे पाठीस आधार धावा. या आसनाच्या शिखर स्थितीमध्ये पंधरा सेकंदांपर्यंत थांबण्याचा प्रयत्न असावा. श्वासगती संथ व खोलवर चालू असावी. आसन स्थिती सोडताना श्वास सोडत प्रथम हात, नंतर पाठ आणि पाय पूर्ववत शनस्थितीमध्ये आणावेत. लाभ थायरॉईड ग्रंथीचे कार्य सुधारण्यास मदत करते. शिवाय प्रजनन संस्थेची कार्यक्षमता सुधारण्यास देखील या आसनाद्वारे मदत मिळते.**

**साहित्य अकादमी पुरस्कार**

साहित्य अकादमीच्या 'युवा' आणि 'बाल' साहित्य पुरस्कारांची घोषणा काल करण्यात आली. यामध्ये मराठी भाषेसाठी प्रदीप कोकरे यांची 'खोल खोल दुष्काळ डोळे' ही कादंबरी आणि सिंधी भाषेतील 'पांधीअड़ो' या कविता संग्रहासाठी मंथन बचाणी यांची 'युवा' साहित्य अकादमी पुरस्कारासाठी निवड झाली, तर 'बाल' साहित्य अकादमी पुरस्कारासाठी कवी डॉ. सुरेश सावंत यांच्या 'आभाळमाया' या कविता संग्रहाची निवड झाली आहे.

**चितमपल्ली**

निसर्गवादी, वन्यजीव संरक्षक आणि प्रख्यात लेखक, पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित अरण्यऋषि मारुति चितमपल्ली यांचं काल सोलापुर इथं राहत्या घरी वृद्धापकाळानं निधन झालं. ते 93 वर्षांचे होते. आज दुपारी 1 वाजल्यानंतर त्यांची अंत्ययात्रा निघणार आहे. चितमपल्ली यांनी कर्नाळा पक्षी अभयारण्य, नवेगाव राष्ट्रीय उद्यान, नागझिरा वन्यजीव अभयारण्य आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्प यांसारख्या विविध जंगलं आणि राष्ट्रीय उद्यानांमध्ये वन विभागाच्या माध्यमातून 36 वर्ष सेवा करताना वन्यप्राण्यांचं वर्तन, वनस्पती, पक्षी यांचा अभ्यास केला आणि जंगलांशी संबंधित रहस्यांचा वेध घेतला, ते अनुभव आपल्या लेखणीतून वाचकांसमोर सजीव केले आणि मोठी ग्रंथसंपदा निर्माण केली. निलवंती, जंगलाचं देणं, घरट्या पलिकडे, रातवा, रानवाटा, प्राणीकोश, पक्षीकोश, सुवर्ण गरुड, निसर्गवाचन, मृगपक्षीशास्त्र अशा अनेक पुस्तकांमधून ते पुढील पिढ्यांना निसर्गाची शब्दसहल घडवत राहतील. चकवा चांदण ही त्यांची आत्मकथा वाचकांना सुपरिचित आहे.

निसर्गाला शब्दरूपांनी साजिवंत करुन मराठी साहित्य संपदा समृद्ध कऱणारे अरण्यऋषि मारुति चितमपल्ली यांच्या निधनानं महाराष्ट्रातील निसर्ग अभ्यासक, साहित्यातील एक दीपस्तंभ निमाला आहे अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रद्धांजली वाहिली आहे. अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या निधनानं एक मौल्यवान निसर्गविचारवंत आणि प्रज्ञावान लेखक हरपला आहे. निसर्गाशी जोडणारी त्यांची लेखणी, पर्यावरणप्रेम जागवणारं कार्य आणि त्यांनी घडवलेली विचारपरंपरा ही भावी पिढ्यांसाठी दीपस्तंभ ठरेल अशी भावना नागपूरचे आमदार संदीप जोशी यांनी व्यक्त केली आहे.

**अपघात**

पुण्याजवळ जेजुरी-मोरगाव रस्त्यावर काल संध्याकाळी भरधाव टेम्पो आणि चारचाकी गाडीच्या अपघातात 8 जणांचा मृत्यू तर चार जण जखमी झाले. जखमींना जेजुरीच्या सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**हवामान**

नाशिक शहर परिसरात काल सायंकाळपासून जोरदार पाऊस सुरू आहे. कळवण तालुक्यातील अर्जुन सागर प्रकल्पात जलसाठा वाढल्यानं विसर्ग सुरू करण्यात आला आहे. पुण्यातही पावसाची संततधार आहे. रायगड जिल्ह्यात सावित्री, पाताळगंगा, अंबा, उल्हास या नद्यांना पूर आले असून रात्री रोह्यात कुंडलिका नदीनं धोक्याची पातळी ओलांडली आहे. नागरिकांना सावधगिरीचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागानं कोकण, मध्य महाराष्ट्रात अतिवृष्टिचा इशारा दिला आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात वीजा आणि जोराच्या वाऱ्यांसह पाऊस पडेल.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.